# महाराष्ट्र शासन
## विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.
### राजाराम महाविद्यालय परिसर, विद्यानगर, कोल्हापूर ४१६ ००४

E-mail: jdhekop@gmail.com/jdhescholarship2@gmail.com

फोन नं. (०२३१) २५३५४००/२५३५४५४ फॅक्स : (०२३१) २५३५४००


जा.क्रं.विससं/उशि/कोवि/शिष्य/२०१८-१९/ 5294 दिनांक :१९/१२/२०१८

प्रति,

१. कुलसचिव,शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

२.सर्व अनुदानित,विनाअनुदानित कला,वाणिज्य ,विज्ञान विधी
व शिक्षणशास्त्रे महाविद्यालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

**विषय :- सन २०१८-१९ च्या खरीप हंगामातील दुष्काळ सदृश्य तालुक्यातील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.**

**संदर्भ :-उशिसं-२०१८/परीक्षा शुल्क/शिष्यवृत्ती/२०२३७/दि.१९/१२/२०१८**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविणेत येते की, सन २०१८-१९ च्या खरीप हंगामातील दुष्काळ सदृश्य १८० तालुक्यातील व राज्यातील दुष्काळ घोषित केलेल्या १५१ तालुक्यांव्यतिरिक्त इतर ९३ तालुक्यामधील २६८ महसूली मंडळातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत तसेच १८ ऑक्टोंबर १९९३ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दुष्काळ सदृश्य तालुक्यातील व दुष्काळ घोषित केलेल्या महसूली मंडळातील सवलतीस पात्र असणाऱ्या विंद्यार्थ्यांकडून महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी परीक्षा फी न घेता त्यांचे आवेदनपत्रे विद्यापीठाकडे सदर शासन निर्णयात नमूद केलेल्या प्रमाणपत्रावर साक्षांकीत करून पाठविणे व सदरचा सोबत दिलेल्या विवरणपत्र-अ मधील माहिती भरून तसा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात यावा.

19.12.18

**विभागीय सहसंचालक,**
**(उच्च शिक्षण)**
**कोल्हापूर विभाग, कोल्हापूर करीता**

**सोबत:- विवरणपत्र-अ**

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१
web: www.dhepune.gov.in
E-mail: scholarshiphd2@gmail.com
फोन नं.०२०/२६१२६९३९
फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं-२०१८/परीक्षा शुल्क/शिष्यवृत्ती / 18690 दिनांक-०१/११/२०१८ 05 NOV 2018

प्रति,
१ सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
२ कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

विषय- सन २०१८-१९ च्या खरीप हंगामातील दुष्काळ सदृश्य तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.

संदर्भ- १ शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय, क्र.एफईडी-१५९२/१२०२/(११३२)/साशि-५, दिनांक १८/१०/१९९३
२ महसुल व वन विभाग शासन निर्णय, क्र.एससीवाय-२०१८/प्र.क्र.८९/म-७, दिनांक २३ ऑक्टोबर, २०१८.
३ महसुल व वन विभाग शासन निर्णय, क्र.एससीवाय-२०१८/प्र.क्र.८९/म-७, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८.
४ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.शुल्क-५२१८/प्र.क्र.४१३/मशि-२, दिनांक ०३ नोव्हेंबर, २०१८.

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये राज्यातील टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची विद्यापीठ परीक्षा व परीक्षा मंडळे यांची परीक्षा फी माफ करण्याची योजना लागू केली आहे. यामध्ये अकृषी विद्यापीठाकडून घेण्यात येणा-या परीक्षांचा समावेश आहे. आता उपरोक्त संदर्भाधिन क्र.२ येथील शासन निर्णयान्वये महसुल व वन विभागाकडून राज्यातील सन २०१८-१९ च्या खरीप हंगाम Trigger-२ लागू केलेल्या तालुक्यांमध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयामध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याची सवलत लागु केलेली आहे. यास्तव सदर १८० तालुक्यामधील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफीसंदर्भात तात्काळ कार्यवाही करावयाची आहे. त्यानुसार आपल्या अधिनस्त संबंधित दुष्काळ सदृश्य तालुक्यातील महाविद्यालयांना खालीलप्रमाणे सुचना देण्यात याव्यात.

१ संदर्भ क्र.१ येथील १८ ऑक्टोबर, १९९३ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दुष्काळ सदृश्य तालुक्यातील सवलतीस पात्र असणा-या विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी परीक्षा फी न घेता त्यांचे आवेदनपत्रे विद्यापीठाकडे संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या प्रमाणपत्रावर साक्षांकित करुन पाठवावे.

२ सद्यस्थितीत विद्यापीठांचे पहिले शैक्षणिक सत्र संपलेले असल्याने महाविद्यालयाने त्यांचे महाविद्यालयात सन २०१८-१९ च्या खरीप हंगामातील दुष्काळ सदृश्य तालुक्यातील पात्र विद्यार्थी शिक्षण घेत असल्यास सदर लाभार्थ्यांना परीक्षा शुल्कापोटी भरलेल्या रकमेची प्रतिपुर्ती करण्यासाठी त्यांचेकडून आलेल्या आवेदनापत्रावरुन



Scanned by CamScanner

प्रतिपुर्तीची रक्कम परिगणना करुन संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कार्यालयाकडे आवश्यक रकमेची मागणी करावी

३ तसेच विद्यापीठाने आपल्याकडे प्राप्त झालेल्या सन २०१८-१९ च्या खरीप हंगामातील दुष्काळ सदृश्य तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपुर्ती करण्यासाठी महाविद्यालय निहाय आलेल्या आवेदनपत्रावरुन प्रतिपुर्तीची रक्कम परिगणना करुन विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कार्यालयाकडे मागणी करावी. व सदर रक्कम महाविद्यालयामार्फत संबंधित लाभार्थ्यांस परत करण्यात यावी.

४ विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, यांनी महाविद्यालयाकडून/विद्यापीठाकडून आलेल्या माहितीची तपासणी करुन आवश्यक रकमेची माहिती संचालनालयाकडे सोबतच्या विवरणपत्र-अ मध्ये सादर करावी. सदरची माहिती सादर केल्यानंतर संचालक स्तरावरुन सहसंचालक कार्यालयांना सदर योजनेसाठी रक्कम उपलब्ध करुन देण्यात येईल व सहसंचालक स्तरावरुन संबंधित रकमेची प्रतिपुर्ती करण्यात येईल.

५ कोणत्याही परिस्थीतीत दुष्काळ सदृश्य तालुक्यातील पात्र विद्यार्थी सदर योजनेपासुन वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत- मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

Scanned by CamScanner

विवरणपत्र-अ

सन २०१८-१९ च्या खरीप हंगामातील दुष्काळ सदृश्य तालुक्यातील व राज्यातील दुष्काळ घोषित केलेल्या १५१ तालुक्याव्यतिरिक्त इतर तालुक्यामधील २६८ महसुली मंडळातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत तपशीलाचे विवरणपत्र

| अ.क्र. | सन २०१८-१९ च्या खरीप हंगामातील दुष्काळ सदृश्य तालुक्यातील व दुष्काळ घोषित केलेल्या महसुली मंडळातील ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्क भरले आहे अशा विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्क भरले आहे अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क प्रतिपुर्तीसाठी आवश्यक रक्कम (रुपये) | सन २०१८-१९ च्या खरीप हंगामातील दुष्काळ सदृश्य तालुक्यातील व दुष्काळ घोषित केलेल्या महसुली मंडळातील ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्क न भरता प्रमाणपत्र दिले आहे अशा विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्र दाखल केले आहे अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क प्रतिपुर्तीसाठी आवश्यक रक्कम (रुपये) | एकूण विद्यार्थी संख्या | एकूण प्रतिपुर्तीची रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

स्वाक्षरी

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१**

web: www.dhepune.gov.in E-mail: scholarshiphd2@gmail.com

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६११११५३

क्र.उशिसं-२०१८/परीक्षा शुल्क/शिष्यवृत्ती / 20417 दिनांक- २४/१२/२०१८

**स्मरणपत्र/ईमेलद्वारा/तात्काळ** 24 DEC 2018

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.

विषय- सन २०१८-१९ च्या खरीप हंगामातील दुष्काळ सदृश्य तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.

संदर्भ- १. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय, क्र.एफईडी-१५९२/१२०२/(११३२)/साशि-५, दिनांक १८/१०/१९९३

२. महसुल व वन विभाग शासन निर्णय, क्र.एससीवाय-२०१८/प्र.क्र.८९/म-७, दिनांक २३ ऑक्टोबर, २०१८.

३. महसुल व वन विभाग शासन निर्णय, क्र.एससीवाय-२०१८/प्र.क्र.८९/म-७, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८.

४. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.शुल्क-५२१८/प्र.क्र.४१३/मशि-२, दिनांक ०३ नोव्हेंबर, २०१८ दिनांक १७ नोव्हेंबर २०१८

५. महसुल व वन विभाग शासन निर्णय, क्र.एससीवाय-२०१८/प्र.क्र.८९/म-७, दिनांक ०६ नोव्हेंबर २०१८.

६. संचालनालयाचे पत्र क्र उशिसं-२०१८/परीक्षा शुल्क/शिष्यवृत्ती/८६९०, दि.०५/११/२०१८, १७.११.२०१८ व दि. १९.१२.२०१८

उपरोक्त विषयी आपणांस कळविण्यात येते की, संचालनालयाचे पत्र दिनांक ०५/११/२०१८, १७/११/२०१८ व १९/१२/२०१८ अन्वये सन २०१८-१९ च्या खरीप हंगामातील दुष्काळ सदृश्य १८० तालुक्यातील व राज्यातील दुष्काळ घोषित केलेल्या १५१ तालुक्याव्यतिरिक्त इतर ९३ तालुक्यामधील २६८ महसुली मंडळातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबतची माहिती विवरणपत्र-अ मध्ये सादर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. तथापि सदरची माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही.

प्रस्तुत प्रकरणी आवश्यक असणा-या निधीचा प्रस्ताव शासनास सादर करावयाचा असल्याने सन २०१८-१९ च्या खरीप हंगामातील दुष्काळ सदृश्य १८० तालुक्यातील व राज्यातील दुष्काळ घोषित केलेल्या १५१ तालुक्याव्यतिरिक्त इतर ९३ तालुक्यामधील २६८ महसुली मंडळातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबतची विवरणपत्र-अ मधील माहिती तात्काळ संचालनालयास सादर करावी.

तसेच १८ ऑक्टोबर, १९९३ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दुष्काळ सदृश्य तालुक्यातील व दुष्काळ घोषित केलेल्या महसुली मंडळातील सवलतीस पात्र असणा-या विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी परीक्षा फी न घेता त्यांचे आवेदनपत्रे विद्यापीठाकडे सदर शासन निर्णयात नमूद केलेल्या प्रमाणपत्रावर साक्षांकित करुन पाठविणेबाबत आपल्या अधिनस्त महाविद्यालयांना/संस्थाना सुचना देण्याता याव्यात.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत :- मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२. यांना माहितीस्तव सादर.

D:\april १८\Exam Fees.docx